पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १३६ (विशेष सभा)**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०७/०९/२०१९** **वेळ – सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **विशेष** सभा **शनिवार दि.०७/०९/२०१९** रोजी **सकाळी ११.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.करुणा शेखर चिंचवडे
५. मा.गीता सुशिल मंचरकर
६. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
७. मा.चोंधे आरती सुरेश
८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
९. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
१०. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
११. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१२. मा.कलाटे मयूर पांडूरंग
१३. मा.कलाटे राहुल तानाजी
१४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखाधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.वाघमारे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.औंभासे, मा.पुजारी, मा.मोरे, मा.देशमुख, मा.सेठीया - कार्यकारी अभियंता, मा.वस्ते – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

(मा.अजित पवार, अतिरिक्त आयुक्त(२) हे महापालिकेत नव्याने रूजू झाले असल्याने मा.सभापती व मा.आयुक्त यांचे हस्ते त्यांचा सत्कार करणेत आला.)

---------

ठराव क्रमांक - ५४४८ | विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/०९/२०१९ | विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/८/कावि/८७४/१९ दि.२३/०८/१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१८/१/२०१८-१९ अन्वये आंद्र व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत "Designing of 300 MLD Water Treatment Plant &Construction, commissioning of 100 MLD Capacity in Phase I and Operation Maintenance for ten years of 100 MLD Capacity at Chikhali Including all Civil, Mechanical, Electrical, Instrumentation, SCADA & Allied works, including 3 months trial run and commissioning." याकामाच्या अंदाजपत्रकीय र.रू.४६,४८,००,०००/-[GST सहीत] (देखभाल व दुरुस्तीची रक्कम वगळून) करिता निविदा काढणेत आली आहे. सदरच्या कामासाठी विभागाने ठेकेदारांकडून GST ची रक्कम वगळून निविदा दर मागविले आहेत. या नुसार प्राप्त निविदांमध्ये मे.गोंडवाना इंजिनिअर्स लि .यांचा निविदा दर न्युनतम असून सदरचा प्राप्त दर खालील प्रमाणे आहे.

- ३०० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्राचे संकल्प चित्र तयार करून १०० द.ल.लि. क्षमतेचे जल शुद्धीकरण केंद्र चिखली येथे उभारणे व तद्दअनुषंगिक कामे करणे (CAPEX) र.रु.४६,४८,००,०००/-(GST वगळून)
- १०० द.ल.लि. क्षमतेचे जल शुद्धीकरण केंद्राचे चालन ,देखभाल व दुरुस्ती पुढील १० वर्षे कालावधी करिता करणे (OPEX): र.रु.३२,५४,६०,०००/-(GST वगळून)

तरी मे.गोंडवाना इंजिनिअर्स लि यांचा एकूण र.रु.७९,०२,६०,०००/- (Capex + Opex: र.रु.४६,४८,००,०००/-+ र.रु.३२,५४,६०,०००/-) (GST वगळून) चा निविदा दर मंजूर झाला असून मे.गोंडवाना इंजिनिअर्स लि. यांचे कडून सदर काम एकूण र.रु.७९,०२,६०,०००/- (अक्षरी र.रू.एकोणऐंशी कोटी दोन लाख साठ हजार फक्त) पर्यंत करुन घेणेस, नियमानुसार निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे या रकमेवर GST अदा करणे,तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५४४९ | विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/०९/२०१९ | विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/८/कावि/९९६/२०१९ दि.०५/०९/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.२३/१/२०१८-१९ अन्वये आंद्र व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत आंद्र व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत "Providing, Lowering, Laying & Commissioning with

allied works of Raw water transmission main from Head work on "Indrayani River"at village Malinagar (Bodkewadi )(Dehu Sourse of 100 mld) up to Chikhali WTP." याकामाच्या अंदाजपत्रकीय र.रू.४७,३९,५०,०००/-[GST सहीत] करिता निविदा काढणेत आली आहे. सदरच्या कामासाठी विभागाने ठेकेदारांकडून GST ची रक्कम वगळून निविदा दर मागविले आहेत. या नुसार प्राप्त निविदांमध्ये मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा निविदा दर + २.२४% (जास्त) न्युनत्तम असून सदरील निविदा प्राप्त दर (Acceptance Limit) निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा -९.२५% कमी येत आहे. तरी मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा एकूण र.रु.४३,२०,५४,०८५/- (GST व गळून) चा निविदा दर मंजूर झाला असून मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे कडून सदर काम एकूण र.रु.४३,२०,५४,०८५/- + रॉयल्टी र.रु.१,८३,०९३/- + मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४६,८,२२२/-= एकूण र.रु.४३,२७,०५,४००/- पर्यंत करुन घेणेस, नियमानुसार निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे या रकमेवर GST अदा करणे,तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१०५६/२०१९
दिनांक – ०७/०९/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडेपुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.